क्रमांक : एनएपी-०२५०/६८-६१/प्र.क्र.८ / ल-५

महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : २६.४.२०१०

प्रति,

सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी

विषय :- <u>सन २००६ ते २०११ या हमी कालावधीसाठी मुंबई उपनगर जिल्ह्यातील नागरी भागातील अकृषिक आकारणीचे प्रमाणदरातील वाढीबाबत प्राप्त झालेल्या तक्रारी संदर्भात</u>

उपरोक्त विषयाबाबत मा. मंत्री (महसूल) यांच्या समवेत दिनांक ५.४.२०१० रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस अप्पर मुख्य सचिव (महसूल), विभागीय आयुक्त, कोंकण विभाग, आयुक्त, पुणे विभाग तसेच जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर व जिल्हाधिकारी, पुणे हजर होते.

२. सदर बैठकीत झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने राज्यातील सर्व नागरी भागात अकृषिक कारणासाठी वापरात असलेल्या जमिनीच्या क्षेत्रावर दिनांक १.८.२००६ ते दिनांक ३१.७.२०११ या हमी कालावधीसाठी सुरु असलेल्या अकृषिक आकारणीच्या वसूलीस या संदर्भातील नवीन धोरण निश्चित होईपर्यंतच्या आदेशापर्यंत स्थगिती देण्यात यावी असे आदेश मा.मंत्री (महसूल) महोदयांनी दिले आहेत. त्यानुसार कार्यवाही करुन आपला अनुपालन अहवाल कृपया शासनास सत्वर सादर करावा.

(शंकर द. इरो)
कार्यासन अधिकारी
महसूल व वन विभाग

प्रत: माहिती व उचित कार्यवाहीकरीता अग्रेषित.

1) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई -३२
२) मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई-३२
३) मा.राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई-३२
४) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय,मुंबई-३२
५) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव /सचिव सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय,मुंबई-३२
६) सह सचिव (ल-५), महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई-३२
७) निवड नस्ती (ल-५) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२